नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १४८ Issue - 148 | वार सोमवार दि. १४ ऑक्टोबर २०२४ Blow- Monday Date 14 October 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## धानाला हेक्टरी २५ हजार बोनस देणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोंदिया : धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रती हेक्टरी २५ हजार रुपयांचा बोनस देण्यात येणार आहे. यासंबंधीची फाइल मुख्यमंत्र्यांकडून मंजूर करून घेणार, अशी घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. येत्या पाच वर्षांपर्यंत कुठल्याही शेतकऱ्याला कृषिपंपाचे वीज बिल भरायचे नाही. उपसा सिंचन योजनेलासुद्धा आम्ही आधीच निधी दिला असल्याचेही त्यांनी सांगितले.

**उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची ग्वाही**

तिरोडा येथे धापेवाडा योजनेच्या टप्पा-२ व ३सह इतर विकासकामांचे भूमिपूजन आणि दुरुस्ती झालेल्या वितरिकेचे लोकार्पण रविवारी करण्यात आले. यावेळी फडणवीस बोलत होते. व्यासपीठावर भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आमदार डॉ. परिणय फुके, आमदार विजय रहांगडाले, जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले, माजी आमदार राजेंद्र जैन, हेमंत पटले यांच्यासह इतर मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

'लाडकी बहीण' योजनेविरुद्ध काँग्रेसचे लोक न्यायालयात गेले. ही योजना फसवी असल्याचा कांगावा केला. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे अणि राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार ही योजना त्यांचे सरकार आल्यास बंद करू असे म्हणत आहेत. पण, लाडक्या बहिणी सोबत असलेले सरकार परत येणार आहे. त्यांचे हे स्वप्नच राहणार असल्याची टीकाही त्यांनी केली.



प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतकरी, लाडक्या बहिणी, युवकांच्या हितासाठी भाजप काम करीत असल्याची ग्वाही दिली.

प्रास्तविकात आमदार विजय रहांगडाले यांनी केले. संचालन माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष मदन पटले यांनी केले. कार्यक्रमादरम्यान धान उत्पादक शेतकऱ्यांना गेल्या वर्षी वीस हजारांचे बोनस दिले होते. यावर्षी पाच हजारांची वाढ करून २५ हजार करण्यात यावे, दिवाळीपूर्वी धान खरेदी केंद्र सुरू करण्यात यावे, अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून मांडली. त्याला फडणवीस यांनी बोनसची फाइल मंजूर केली जाईल, असा विश्वास दिला.

## बाबा सिद्दीकींच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार ) नेते बाबा सिद्दीकी यांची शनिवारी रात्री गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. आज मरीन लाईन्स येथील बडा कब्रस्तान येथे त्यांचा शासकीय इतमामात दफनविधी करण्यात आला आहे. आज सायंकाळीच त्यांच्या अंत्ययात्रेला सुरुवात झाली होती. यावेळी बॉलिवूड कलाकारांसह राजकीय नेत्यांनी त्यांना अखेरचा निरोप दिला. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित असल्याचंही बघायला मिळालं. आज सकाळी बाबा सिद्दिकी यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी त्यांच्या वांद्रे येथील निवासस्थानी ठेवण्यात आलं होतं. त्यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी सलमान खान, संजय दत्तसह अनेक बॉलिवूड सेलिब्रिटी तसेच राजकीय नेते याठिकाणी दाखल झाले होते. तसेच नागरिकांनी याठिकाणी मोठी गर्दी केली होती. शनिवारी रात्री बाबा सिद्दीकी यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. ते वांद्रे येथील खेरवाडी सिग्नलजवळ झिशान सिद्दीकी यांच्या ऑफिसमध्ये चालले होते. त्यावेळी तिघांनी बाबा सिद्दीकी यांच्यावर चार ते पाच राऊंड फायर केले. यापैकी दोन राऊंड बाबा सिद्दीकी यांच्या छाती आणि पोटावर लागले होते. त्यामुळे त्यांना तत्काळ लिलावती रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. मात्र, रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता. या गोळीबारात त्यांच्या एका सहकाऱ्यांच्या पायालाही गोळी लागली होती.

## सिद्दीकी हत्या प्रकरणी पोलिसांनी पुण्यातून घेतलं एकाला ताब्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : बाबा सिद्दीकी यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली आहे. या घटनेनं संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या प्रकरणात दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. तर इतर दोन आरोपी फरार आहेत. दरम्यान, आता याप्रकरणी फेसबूक पोस्ट करणाऱ्या शुभम लोणकर नावाच्या एका संशयित आरोपीच्या भावाला पुण्यातून अटक करण्यात आली आहे. प्रवीण लोणकर (२८) असं या आरोपीचं नाव आहे. दोघेही भाऊ बाबा सिद्दीकी यांच्या हत्येच्या कटात सहभागी असल्याचा आरोप त्यांच्यावर आहे.

शनिवारी रात्री झालेल्या गोळीबाराच्या घटनेनंतर या हत्येची जबाबदारी स्वीकारणारी एक फेसबुक पोस्ट शुबू लोणकर महाराष्ट्र या फेसबूक पेजवरून शेयर करण्यात आली होती. त्यानंतर पोलिसांकडून त्याचा शोध घेतला जात होता. शुबू हा अकोला जिल्ह्याच्या अकोट येथील शुभम रामेश्वर लोणकर आहे, अशी माहिती पुढे आली होती. या दृष्टीने पोलीस तपास करत होते. या तपासादरम्यान पोलिसांनी त्याच्या अकोट येथील घरी दाखल झाले. मात्र, घराला कुलूप होतं. शेजाऱ्यांकडे विचारपूस केली असता, दोघेही भाऊ पुण्यात राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्या पुण्यातील घरी छापा टाकला. त्यावेळी शुभम लोणकर हा फरार असल्याचे त्यांच्या लक्षात आलं. तसेच पोलिसांनी त्याचा भाऊ प्रवीण लोणकरला अटक केली. हे दोघेही बाबा सिद्दीकी यांच्या हत्येचा कटात सहभागी होते, असा प्राथमिक अंदाज आहे. पोलीस आता शुभम लोणकर याचा शोध घेत आहेत.

दरम्यान, याप्रकरणी आतापर्यंत तिघांना अटक करण्यात आली आहे. यापूर्वी पोलिसांनी वांद्रे येथून दोघांनी अटक केली होती. आता पुण्यातून आणखी एकाला अटक केली आहे. गुरुमीत सिंग आणि धर्मराज कश्यप असं आधी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. यापैकी गुरुमीत सिंग हा हरियाणाचा, तर धर्मराज कश्यप उत्तर प्रदेशातील रहिवासी आहे. दोघांनाही आज न्यायालयात हजर करण्यात आलं होतं. न्यायालयाने गुरुमीत सिंगला २१ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली, तर धर्मराज कश्यप याची हाडासंदर्भातली एक चाचणी करण्याचे निर्देश दिले. आरोपी धर्मराज कश्यपने त्याचं वय कोर्टात १७ वर्षे असं सांगितलं. त्यामुळे न्यायालयाने याप्रकरणी त्याच्या वय निश्चितीसाठी हाडांची चाचणी करण्यासंबंधीचे निर्देश दिले. या चाचणीचा अहवाल आल्यानंतर त्याच्याविषयीचा निर्णय घेतला जाणार आहे.

## मराठीचा डंका अधिक जोमाने वाजणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : माय मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने आता मराठी भाषेचा डंका अधिक जोमाने सर्वत्र गाजणार आहे. मराठी भाषेच्या संवर्धन आणि विकासासाठी मुंबईत होत असलेले मराठी भाषा भवन उत्तम आणि दर्जेदार व्हावे. या भाषा भवनाच्या माध्यमातून मराठी भाषा अधिक समृद्ध आणि प्रगल्भ करण्यासाठी अधिक जोमाने काम केले जाईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी येथे केले.

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मराठी भाषा भवनाचे भूमिपूजन**

चर्नी रोड (प.) येथील जवाहर बालभवन परिसरात उभारण्यात येणाऱ्या 'मराठी भाषा भवन'चे भूमिपूजन आणि मुंबई महापालिका विकास निधी व मुंबई शहर जिल्हाअंतर्गत जिल्हा वार्षिक योजना यातून होणाऱ्या विविध विकास कामांचे भूमिपूजन / लोकार्पण शिंदे यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले. समारंभास विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, शालेय शिक्षण आणि मराठी भाषा मंत्री व मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, सिद्धिविनायक ट्रस्टचे अध्यक्ष आमदार सदा सरवणकर, महापालिका आयुक्त भूषण गगराणी, मराठी भाषा विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा म्हैसकर यांसह विविध मान्यवर उपस्थित होते.



या भाषा भवनाच्या माध्यमातून मराठी भाषेच्या संवर्धन, संशोधन आणि प्रसारासाठी अधिक बळ मिळेल. भाषा भवनसाठी साहित्यिक व अन्य क्षेत्रातून आलेल्या सूचनांचा आदर केला जाईल, असे शिंदे यांनी नमूद केले. मराठी भाषा दोन हजार वर्षांपेक्षा अधिक जुनी असल्याचे सिद्ध झाले असून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी अनेकांचे योगदान मिळाले आहे. सर्वांनी केलेल्या सकारात्मक प्रयत्नांमुळेच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे. संतांनी अभंग, गवळण, भारुड यातून मराठी भाषेचे सौंदर्य समोर आणले. मराठी भाषेच्या वैभवात भर घातली. ज्ञानपीठकारांनी आणि सर्व साहित्यिकांनी मराठी भाषा समृद्ध केली आहे असे सांगून मराठी भाषेच्या विकासासाठी जे-जे करता येईल ते केले जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिली.

## 'पीएम गतिशक्ती' हा आर्थिक वाढ आणि शाश्वत विकासासाठी एक परिवर्तनशील उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारताच्या पायाभूत सुविधांमध्ये क्रांती घडवून आणण्याच्या उद्देशाने 'पंतप्रधान गतिशक्ती नॅशनल मास्टर प्लॅन' एक परिवर्तनशील उपक्रम म्हणून उदयास आला आहे. याद्वारे बहुविध जोडणीमध्ये लक्षणीय वाढ झाली असून, विविध क्षेत्रांमध्ये जलद आणि अधिक कार्यक्षम विकास घडवण्यासाठी हा उपक्रम राबवला जात असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी 'एक्स'वरील संदेशात नमूद केले आहे.

विविध आर्थिक क्षेत्रांना बहुविध जोडणींतून पायाभूत सुविधा प्रदान करण्यासाठी 'पीएम गतिशक्ती नॅशनल मास्टर प्लॅन' (पीएमजीएस-एनएमपी) उपक्रम १३ ऑक्टोबर २०२१ रोजी सुरू करण्यात आला.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बहुविध जोडणीसाठी सुरू केलेल्या 'पीएम गतिशक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅन' उपक्रमाला आज तीन वर्षे पूर्ण होत आहेत. लॉजिस्टिक्स क्षेत्र सुव्यवस्थित करून आणि जोडणी वाढवून, हा उपक्रम जलद आणि अधिक कार्यक्षम प्रकल्पांच्या अंमलबजावणीला प्रोत्साहन देत असल्याचे गोयल यांनी 'एक्स'वर म्हटले आहे. एक आधुनिक, परस्परसंबंधित पायाभूत सुविधांचे जाळे विकसित करण्यात, विकसित भारत निर्माण करण्याच्या दृष्टिकोनाला बळकट करण्यात हा उपक्रम निर्णायक भूमिका बजावत आहे, असेही ते म्हणाले.**

या उपक्रमाला आज तीन वर्षे पूर्ण झाल्याबद्दल पंतप्रधान मोदी यांनी केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी प्रसिद्ध केलेल्या संदेशाला 'टॅग' करून 'पीएम गतिशक्ती' उपक्रमाचे कौतुक केले. 'पीएम गतिशक्ती' हा आर्थिक वाढ आणि शाश्वत विकासासाठी एक परिवर्तनशील उपक्रम असून जो रेल्वे, रस्ते, बंदरे, जलमार्ग, विमानतळ, मास ट्रान्सपोर्ट आणि लॉजिस्टिक इन्फ्रास्ट्रक्चर या सात इंजिनांवर धावतो, असे मोदींनी सांगितले.



**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन**

विविध भागधारकांच्या एकत्रीकरणामुळे लॉजिस्टिक क्षेत्राला एकप्रकारे चालना मिळाली, विलंब कमी झाला आणि अनेकांसाठी नवीन संधी निर्माण झाल्या आहेत. विकसित भारताची संकल्पना पूर्ण करण्यासाठी गतिशक्ती उपक्रमाचा मोठा हातभार लाभत आहे. यामुळे प्रगती, उद्योजकता आणि नवनिर्मितीला प्रोत्साहन मिळेल,' असेही पंतप्रधान म्हणाले.

'पीएम गतिशक्ती'च्या तिसऱ्या वर्धापनदिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीतील भारत मंडपम् येथील पीएम गतिशक्ती अनुभूती केंद्राला रविवारी अचानक भेट दिली. या अनुभूती केंद्रात या उपक्रमाची प्रमुख वैशिष्ट्ये, उपलब्धी आणि टप्पे दाखवण्यात आले आहेत.

**हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या स्मारकाचे भूमिपूजन** — **आ. राणाजगजितसिंह पाटील**

## नाईक साहेबांचे स्मारक राज्यातील सर्वात सुंदर स्मारक असेल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : हरित क्रांतिचे प्रणेते माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे स्मारक राज्यातील सर्वात चांगले आणि अभिमानास्पद असेल. यातून अनेकांना चिरंतन प्रेरणा मिळणार आहेत. स्मारक अधिक समर्पक आणि भव्यदिव्य करण्यासाठी आपण जाणीवपूर्वक प्रयत्न केले आहेत. त्यासाठी महायुती सरकारनेही अडीच कोटींचा निधी मंजूर केला आहे. दिवंगत नाईक साहेबांच्या यांच्या विचारांचा हा खराखुरा सन्मान आहे. असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

नळदुर्ग येथील वसंतनगर येथे उभारण्यात येत असलेल्या दिवंगत वसंतराव नाईक यांच्या स्मारकाचे भूमिपूजन रविवारी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. राज्यातील बंजारा समाज बांधवांच्या बाबतीत महायुती सरकारने नेहमीच आस्था बाळगलेली आहे. यापुढेही त्यात तसूभर फरक पडणार नाही. आपल्या महायुती सरकारने आता राज्यातील तांड्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी व्यापक विकास आराखडा तयार करण्याचे नियोजन केले आहे. विकास आराखड्यानुसार सर्व तांड्यांचा सर्वांगीण विकास करण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवण्यात आले आहे. राज्यातील कृषी क्षेत्राला अभिमानास्पद आयाम देणाऱ्या हरित क्रांतीचे प्रणेते राहिलेल्या वसंतराव नाईक यांच्या स्मारकाच्या कामापसून या सर्वांगीण विकासाचा शुभारंभ होत असल्याचेही आमदार पाटील यांनी यावेळी नमूद केले. विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर नाईक यांच्या स्मारकाचे आपल्या सर्वांच्या साक्षीने भूमिपूजन झाले आहे. यानिमित्ताने एकमेकांच्या अडचणी सोडविण्यासाठी आज आपण एकमेकांना शब्द देत आहोत. मात्र त्यासाठी सर्व बंजारा समाज बांधव आणि भगिनींनी आपल्या महायुतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहायला हवे. नाईक यांच्या स्मारकाच्या माध्यमातून ही नवी सुरुवात आहे.

**पुढील काळात आपल्याला आणखी नवनवे टप्पे गाठायचे आहेत. आपल्या भागातील तरुणांना आपल्याला हक्काचा रोजगार उपलब्ध करुन द्यायचा आहे. नवनवे उद्योग आपल्या भागत आणण्यासाठी आपले प्रयत्न सुरू आहेत. कौडगाव येठे एमआयडीसीच्या माध्यमातून तांत्रिक वस्त्रोद्योग निर्मिती प्रकल्प उभारण्यात येत आहे. पायाभूत सुविधांसाठी पहिल्या टप्प्यात आपल्या सरकारने २४ कोटी रुपयांचा निधीही मंजूर केला आहे. याठिकाणी दहा हजार रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. तामलवाडी येथेही ३७० एकरावर एमआयडीसी साकारण्याचे काम सुरू आहे. तेथेही सोलापूर जिल्ह्यातील दीडशेहुन अधिक उद्योजक गुंतवणूक करण्यासाठी उत्सुक आहेत. त्यामुळे तामलवाडी एमआयडीसीत १२ हजार रोजगार निर्मितीचे आपले उद्दिष्ट आहे. हे सर्व एकट्या दुकट्याचे काम नाही. त्यासाठी आपल्या सर्वांचे पाठबळ आणि सहकार्य महत्वाचे असल्याचे आवाहनही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले.**

राज्यात १९७२ साली भयंकर दुष्काळ पडला होता. त्यावेळी राज्याचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक साहेब होते. त्यावेळी ते स्वतः नळदुर्ग येथे आले होते. त्यांच्या पदस्पर्शामुळे वसंतनगराचा हा परिसर पावन झालेला आहे. या पावन भूमीवर नाईक साहेबाचे स्मारक असावे अशी बंजारा समाज बांधवांची मागील अनेक वर्षापासूनची मागणी होती. आपल्या माध्यमातून या मागणीला मूर्त रूप येत आहे. नाईक साहेबांचे स्मारक साकारण्याची संधी आपल्याला लाभली हे आपले भाग्य असल्याचेही आमदार पाटील यावेळी म्हणाले.

यावेळी भाजपाचे विशेष निमंत्रित प्रदेश कार्यकारणी सदस्य विद्यानंद राठोड व त्यांच्या टीमने वसंतराव नाईक साहेबांच्या स्मारकासाठी परिश्रम घेतल्याने त्यांचे टाळ्या वाजून स्वागत करण्यात आले. तर संत सेवालाल महाराज तांडा समृद्धी योजनेचे धाराशिव जिल्हा अशासकीय सदस्य प्राचार्य संतोष चव्हाण व विलास राठोड यांनी आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांना तांडा समृद्धी योजनेचा विकास आराखडा सादर केला. यावेळी



तुळजापूर तालुका बंजारा बांधवांच्या वतीने व वसंतराव नाईक साहेब स्मारक समितीच्या वतीने आमदार पाटील यांचा जंगी सत्कार करण्यात आला. तर शासनाच्या संत सेवालाल बंजारा तांडा समृद्धी योजना नागपुर विदर्भ कमीटीवर अशासकीय सदस्य पदी प्रविण पवार यांची निवड झाल्याबद्दल आमदार पाटील यांनी सन्मान केला. याप्रसंगी भाजपाचे विशेष निमंत्रित प्रदेश कार्यकारणी सदस्य विद्यानंद राठोड, भाजपा तालुकाध्यक्ष संतोष बोबडे , प्रदेश कार्यकारिणी सदस्य सतीश दंडनाईक , सुशांत भूमकर , किसान मोर्चाचे रामदास कोळगे, माजी जि.प.सदस्य गणेश सोनटक्के, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक सिध्देश्वर कोरे, ताराबाई पवार, प्रशांत लोमटे, साहेबराव घुगे, अप्पू जेवळे, विवेकानंद मेलगिरी, भिवा इंगोले, युवराज पाटील, धिमाजी घुगे, श्रमिक पोतदार,पद्माकर घोडके, नळदुर्ग नगरपरिषदेचे माजी नगरसेवक निरंजन राठोड, छमाबाई राठोड, आनिल पवार, शिवाजी चव्हाण शिंगोली यांची प्रमुख उपस्थितीत होती.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निरंजन राठोड, प्रवीण पवार, विलास राठोड, दामाजी राठोड महेश चव्हाण यांनी परिश्रम घेतले .

## संपादकीय....

## आरोपींच्या मागावर

बाबा सिद्दीकी यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली आहे. या घटनेनं संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या प्रकरणात दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. तर इतर दोन आरोपी फरार आहेत. दरम्यान, आता याप्रकरणी फेसबूक पोस्ट करणाऱ्या शुभम लोणकर नावाच्या एका संशयित आरोपीच्या भावाला पुण्यातून अटक करण्यात आली आहे. प्रवीण लोणकर (२८) असं या आरोपीचं नाव आहे. दोघेही भाऊ बाबा सिद्दीकी यांच्या हत्येच्या कटात सहभागी असल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. शनिवारी रात्री झालेल्या गोळीबाराच्या घटनेनंतर या हत्येची जबाबदारी स्वीकारणारी एक फेसबुक पोस्ट शुबू लोणकर महाराष्ट्र या फेसबूक पेजवरून शेयर करण्यात आली होती. त्यानंतर पोलिसांकडून त्याचा शोध घेतला जात होता. शुबू हा अकोला जिल्ह्याच्या अकोट येथील शुभम रामेश्वर लोणकर आहे, अशी माहिती पुढे आली होती. या दृष्टीने पोलीस तपास करत होते. या तपासादरम्यान पोलिसांनी त्याच्या अकोट येथील घरी दाखल झाले. मात्र, घराला कुलूप होतं. शेजाऱ्यांकडे विचारपूस केली असता, दोघेही भाऊ पुण्यात राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्या पुण्यातील घरी छापा टाकला. त्यावेळी शुभम लोणकर हा फरार असल्याचे त्यांच्या लक्षात आलं. तसेच पोलिसांनी त्याचा भाऊ प्रवीण लोणकरला अटक केली. हे दोघेही बाबा सिद्दीकी यांच्या हत्येचा कटात सहभागी होते, असा प्राथमिक अंदाज आहे. पोलीस आता शुभम लोणकर याचा शोध घेत आहेत. दरम्यान, याप्रकरणी आतापर्यंत तिघांना अटक करण्यात आली आहे. यापूर्वी पोलिसांनी वांद्रे येथून दोघांनी अटक केली होती. आता पुण्यातून आणखी एकाला अटक केली आहे. गुरुमीत सिंग आणि धर्मराज कश्यप असं आधी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. यापैकी गुरुमीत सिंग हा हरियाणाचा, तर धर्मराज कश्यप उत्तर प्रदेशातील रहिवासी आहे. दोघांनाही आज न्यायालयात हजर करण्यात आलं होतं. न्यायालयाने गुरुमीत सिंगला २१ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली, तर धर्मराज कश्यप याची हाडासंदर्भातली एक चाचणी करण्याचे निर्देश दिले. आरोपी धर्मराज कश्यपने त्याचं वय कोर्टात १७ वर्षे असं सांगितलं. त्यामुळे न्यायालयाने याप्रकरणी त्याच्या वय निश्चितीसाठी हाडांची चाचणी करण्यासंबंधीचे निर्देश दिले. या चाचणीचा अहवाल आल्यानंतर त्याच्याविषयीचा निर्णय घेतला जाणार आहे.

## आमदार डॉ.राजेंद्र शिंगणे यांनी केला अजीम नवाज राही यांचा सत्कार

**दैनिक यश सिध्दी न्युज नेटवर्क**

चिखली तालुका प्रतिनिधी/ कैलास आंधळे : सहकारमहर्षी स्व.भास्करराव शिंगणे यांची ३२ वी पुण्यतिथी भगिरथ मिश्रखत कारखाना परिसरातील समाधीस्थळावर भक्तीमय वातावरणात साजरी झाली,पुण्यतिथी सोहळ्यातील सूत्रसंचालनाला ३२ वर्षांचा कालावधी पूर्ण झाल्याबद्दल शिंगणे परिवार शेंदुर्जन आणि बुलडाणा तर्फे प्रख्यात मराठी कवी, नामवंत निवेदक अजीम नवाज राही यांचा सत्कार आमदार डॉ राजेंद्र शिंगणे यांनी केला.



सहकारमहर्षी स्व.भास्करराव शिंगणे यांच्या राजकीय उदयापासून तर त्यांच्या निधनापर्यंत अजीम नवाज राही यांच्या निष्ठेचा पर्यायाने त्यांच्या वाणीचा प्रवास, सहकारमहर्षी स्व. भास्करराव शिंगणे यांच्या पहिल्या पुण्यतिथीपासून स्मृतीज्योतीची मुहूर्तमेढ रोवण्यात आली, ही महूर्तमेढ रोवण्यात अजीम नवाज राही यांच्यासह जगन्नाथ बोरकर, गौतम खिल्लारे, राजेश दवणे, हिम्मतराव पाटील, डॉ शिवाजीराव निकम, विठोबा किलबिले, छगनराव बाहेकर, आत्माराम गाडेकर, श्रीराम सुसर यांचा समावेश होता. कालांतराने मनिष बोरकर, विशाल फदाट, वैभव हिंगे, संदीप सोनुने, श्रीजीत देशमुख, अमोल टाकले, गजानन मुळे, विजय कऱ्हाडे ही तरुणमंडळी स्मृतीज्योच्या आयोजनात सहभागी झाली.

दरसाल ही स्मृतीज्योत भल्यापहाटे राजमाता, राष्ट्रमाता आई जिजाऊच्या समाधीस्थळाचे दर्शन घेऊन सिंदखेडराजा येथून निघून दुसरबीड, बिबी, मलकापूर पांग्रा, शेंदुर्जन, साखरखेर्डा, शिंदी, मेरा, चिखली मार्गे बुलडाणा येथील भगिरथ मिश्रखत कारखाण्याजवळील सहकारमहर्षी स्व.भास्करराव शिंगणे यांच्या समाधीस्थळावर पोहाेचत असते. सिंदखेडराजा येथून निघणाऱ्या या स्मृतीज्योतीपासून प्रेरणा घेऊन आता सिंदखेडराजा, देऊळगाव कोळ, खामगाव, बोरजवळा येथूनही स्मृतीज्योती निघू लागल्या. उपरोक्त सगळ्या स्मृतीज्योती समाधीस्थळावर पोहोचल्यावर आमदार डॉ राजेंद्र शिंगणे यांच्या सुपूर्द केल्या जातात,नंतर समाधीस्थळावर सुरू होतो.

अभिवादन सोहळा, अभिवादन सोहळ्यात भाषणांची परंपरा नाही, प्रास्ताविकाची, मनोगताची, सूत्रसंचालनाची, आभारप्रदर्शनाची जबाबदारी असते एकट्या अजीम नवाज राही यांच्याकडे उपरोक्त परंपरेला तब्बल ३२ वर्षांचा प्रदीर्घ कालावधी उलटला,११ ऑक्टोंबर रोजी सहकारमहर्षी स्व भास्करराव शिंगणे यांच्या पावन पुण्यतिथी सोहळ्यात अजीम नवाज राही यांच्या ३२ वर्षीय वाणीच्या प्रवासाची नोंद घेऊन आमदार डॉ.राजेंद्र शिंगणे यांनी सहकारमहर्षी स्व. भास्करराव शिंगणे यांची प्रतिमा देऊन अजीम नवाज राही यांचा यथोचित्त सत्कार केला.

# आनंदाचे व्याकरण नवी साक्षरता

मनाचा अंतरिक शोध हा स्वतः च स्वतःसाठी घेणे. ही मन चिंतनाची प्रारंभिक सुरुवात आहे.मनाच्या आयुष्यभर च्या प्रवासात स्वतः सोबत फक्त मन असते .इतर सगळ्या आठवणी असतात या स्मृतींचे साठत जाणारे स्वरूप हे माणसाला खूप भूतकाळ सोबत वाढवण्यास मदत करते .माणूस मात्र या आठवणींच्या सोबतच कटुता जास्त संचित करतो आणि स्वतःला अस्वस्थ उद्धवस्त मानसिक पातळीवर करत राहतो हे माणसांचे मनांतिक वर्तन ही गोष्ट प्रत्येकाला तपासता आली पाहिजे बाहेरून मन आणि भावनांच्या वर होणारे संचित परिणाम हे जितके महत्त्वाचे आवश्यक वाढतात .होत राहतात .त्याहीपेक्षा मनांतरीत वर्तन ही एक सजग गोष्ट असायला हवी ही सजगता तयार करण्यासाठी मन शोध मन चिंतन मन अस्वस्थतेच्या कारणांच्या तळापर्यंत जाणे हे प्रत्येकाला जमायलाच हवे बाह्य जगाच्या अनेक घटकांचा आघात होऊन होऊन मनाचा सर्व प्रकारच्या भावनांचा संचय ही वाढत राहणारी गोष्ट असते, पण त्यातूनच निर्माण होणारे मानसिक वर्तनाचे बदल हे पण आपणाला कळाले पाहिजेत. अगदी सम काळामध्ये माणसाचे मन स्वयंशांतता गमवून एका अनामिक भरकटलेल्या भ्रमाच्या दिशेने आभासीच्या जगातील स्मृतीवर पुढे निघाले आहे .आभासी स्मृतीचे आणि वास्तवाचे काही नाते नाही. आभासी स्मृती या खऱ्या म्हणून मनाच्या वर्तनाचे भलेभुरे समाधान स्वतःच करत राहणे .हा एक वास्तवापासून प्रत्येक माणसाला तोडण्याचा, रोखण्याचा हा तंत्रज्ञानाचा प्रयत्न आहे. वास्तवाचे जग आणि आभासी जग यांचे दोन गट आता निरंतर राहणार आहेत .आभासी जगाची गतिमानता त्याच्या स्वीकृतीचे मन मेंदूवर होणारे परिणाम यामुळे वर्तमानाच्या मानव जातीवर अगदी आपल्या सभोवतालच्या प्रत्येक व्यक्तीवर किती प्रकारचे विधायक व विघातक परिणाम होत राहतात? हे आपणाला समजून घेता आले पाहिजेत . नैराश्य ,चिंता ,अनावश्यक भीती आणि अतिरेकी काळजी या सगळ्या भावना आभासी जगाने माणसाला विशेष बहाल केलेले बक्षीस आहे: . मानवी वर्तन ही सतत नैराश्याला भीतीला बळी जाणारी गोष्ट आहे .याचे कारण मनाचा अप्रतिरोध आणि संयम हा वाढवायचा असतो प्रतीक्षेची मनाला सवय असायला हवी तात्काळ गतिशील आणि मंनचाही प्राप्ती ही माणसाला प्रतिक्षेपासून दूर ठेवते. प्रतीक्षेत संयम आहे प्रतिरोधात शक्ती आहे. हे मनाचे वैशिष्ट्य आपणच विकसित करायला हवे .पण नैराश्याच्या आणि चिंतेच्या भावना जगभर आता वाढू लागल्या आहेत. या भावनिक वर्तनचे दुष्परिणाम स्वतःवर किती होतात? इतरांवर त्याचा परिणाम किती होतो? हे आपण तपासत नाही. बोलत नाही. या मानसिक वर्तनाला आपण संवादाचे स्वरूप दिले पाहिजे. मनसंवाद हा यासाठीच असायला हवा मनात निर्माण होणारी नैराश्याची भावना त्याची कारणे अनावश्यक चिंता आणि नको इतकी काळजी हे वर्तन कमी कसे करता येईल ?त्यासाठी कोणते उपाय स्वतः करणे आवश्यक आहे? बाह्य घटकांची परिणाम आणि स्वयं मनाच्या वर्तनातून विघातक होणारा परिणाम यातला फरक प्रत्येक व्यक्तीला मन संवादातून मन शोधातून घेता आला पाहिजे. परिस्थिती समाज सभोवतालच्या घटनांनी प्रसंग हे या सगळ्या विधायक आणि विघातक परिणामाला जबाबदार असतातच पण स्वयं व्यक्ती आपले मन निरामय ठेवण्यासाठी प्रयत्न करू शकते मनाचे आरोग्य बिघडले आहे काय? हे तक्षणी कळणे हे सुद्धा फार महत्त्वाचे आहे .समकाल हा गतिशील आहे. मन ,मेंदू ,भावना या सर्वांच्यावर असंख्य प्रकारचे संमिश्र परिणाम क्षणोक्षणी होत आहेत. असा हा कालखंड मानवी प्रज्ञेला न पेलणार आहे. धर्माचे परिणाम जातीचे प्रणाम राजकारणाचे परिणाम हिंसा आणि व्यक्तिगत जीवनातल्या समस्या या सर्वांच्या आघातातून मनस्वास्थ्य बिघडणे हे वेगाने होऊ लागले आहेत .यासाठी मन शोधाच्या मन आरोग्याच्या काही शिस्त बद्ध वर्तन पद्धती प्रत्येक व्यक्तीने समजून घेतल्या पाहिजेत. कथा यश कथा भयकथा नीतिकता बोधकथा या साहित्यातील विविध प्रकारांचे मनावरती बालपणामध्ये भिन्न भिन्न प्रकार होत असत. वाचनाच्या या सवयीतून मनाचा विकास होत असते. आज दृश्य प्रतिमा आणि संदेश हे मनाच्या विकासाला खूप प्रमाणात उपयुक्त आहेत का? मनाचा वेग आणि दृश्य प्रतिमांचा वेग हे एकमेकाला जुळत नाहीत. मनामधील पूर्व स्मृती आणि वेगवान बाह्य घटकांचा संदेश हे एकमेकाला अंतरिक पातळीवर छेद देतात, आणि स्मृतीचे विखंडन होते म्हणून आपल्या मनातील चाललेल्या असंख्य प्रकारच्या भावनांचे युद्ध आपल्या प्रियजनांना हितचिंतकांना सांगता आले पाहिजेत .मनातील आंतरिक कल्लोळ हा व्यक्त करणे. हा मनस्वास्थ्याचा सामान्य उपाय आहे.

साठलेले नाही राष्ट्र दाटून आलेल्या भावना आणि नको इतकी भविष्यकाळाची काळजी यातील चूक आणि बरोबर हे पुढे ठरत असते, पण निर्माण होणारा हा संमिश्रकल्लोळ आपण हितचिंतकांना विनम्रपणे खुलेपणाने सांगितला तर साठलेला हा अनावश्यक ताण मोकळा होतो ,आणि मन हलके होते. खूप काही भावनांचे जड ओझे साठवत राहणे. हा निरोगी मनासाठी उपयोगी नसलेला घटक आहे जगभर सिद्ध झाले आहे. की मनमोकळे करा बोलत रहा .संवाद साधा नैराश्याची भावना साठवू नका .त्याला मोकळी वाट करून द्या. हे साधे साधे उपाय प्रत्येक व्यक्तीच्या बाबत अत्यंत उपयुक्त आहेत.

खूप जग समजून घ्यायचे आहे .खूप ज्ञान मिळवायचे खूप प्रभावी प्रतिमा तयार करायचे आहे. या स्पर्धेकडे माणूस सतत आकृष्ट होतो त्यात लीन होतो आणि स्वतःच्या मनाचे स्वास्थ्य या वेगाबरोबर बिघडवून घेतो. नुकत्याच झालेल्या जागतिक मानसिक आरोग्य दिनाचे खूप महत्त्व कथन केले गेले. मनाच्या आरोग्याचा विचार हळू का होईना सर्व प्रकारच्या माध्यमातून सामान्य माणसांच्या पर्यंत पोहोचतो आहे. मन स्वास्थ्य नावाची गोष्ट आपले विचाराचा घटक बनला पाहिजे प्राचीन परंपरेत चिंतन मेडिटेशन साधना आराधना हे सगळे मनाचे तळ शोधण्याचे प्रयत्न होते. आधुनिक जगात याबद्दल शास्त्रशुद्ध अभ्यास सुरू आहे. लान्सेंट या मनो विश्लेषण अहवाल २०१७ यामध्ये १९ कोटी ७३ लाख व्यक्ती भारतात दुभंगलेल्या मानसिक स्थितीत मध्य वर्तन करीत असल्याचे आढळून आले आहे. चार कोटी ५७ लाख नागरिक नैराश्याच्या खोल दरीमध्ये अडकलेल्या आहे .त्यांचे वर्तन दवि धा अवस्थेत असल्याचे या अभ्यास अहवालावरून जाहीर करण्यात आली आहे. म्हणूनच ही शास्त्रशुद्ध मनवर्तनाची भारत देश ही अवस्था हा एक विचाराचा अभ्यासाचा घटक सर्वांचाच असायला हवा असंख्य प्रकारची माहिती घेणारे आपल्या अधीर मन आपल्याच मन अवस्थेचे अवलोकन करील तर त्याचे लाभच निश्चित होत राहतील.

या अहवाला मधून आढळून आलेले निष्कर्ष व त्यावर सुचवण्यात आलेले उपाय हे मानसिक आरोग्यासाठी खूप उपयुक्त आहेत. नमूद केले आहे की मन स्वास्थ्याची साक्षरता वाढवली पाहिजे. मन साक्षरता समजून सांगणाऱ्या चळवळी सुरू केल्या पाहिजेत .मनावरील हे सर्व प्रकारचे होत राहणारे परिणाम समजावून घेतले पाहिजेत, आणि मनाचा प्रतिरोध ही शक्ती वाढवता येते हेही शिकवले पाहिजे. यासाठीच जागतिक मानसिक आरोग्य दिन हा जो साजरा करण्यात येतो आहे .तो १० ऑक्टोबरला नुकताच झाला आहे. त्यामध्ये प्रथमच नमूद केले आहे, की मानसिक आरोग्य म्हणजे तुम्ही सर्वस्वी नाही .त्या बाबतची सजगता हा प्राथमिक उपाय आहे. आपल्या स्वतःसाठी तो करणे आवश्यक आहे. हे प्रथम कथन केले जाते ,आणि तिथून व्यक्तीच्या निरामय मानसिक ते साठी त्या व्यक्तीला साक्षर करण्याची चळवळ पुढे नेता येते .यासाठी विपरीत परिस्थितीत मन दुभंगलेल्या व्यक्ती कशा वर्तन करतात प्रतिरोध कसा करतात मनाचा संयम कसा वाढवतात. अस्वस्थ मनाला नियंत्रित कसे करतात. याची उदाहरणे समजावून घेणे. साहित्यातून अशा व्यक्तिरेखा वाचणे व आपल्या मनाची शक्ती वाढवणे हे व्यक्तीला मानसिक आरोग्यासाठी आवश्यक आहे .हे जर आत्मसात केले नाही. तर दाटून येणारे नैराश्य चिंता काळजी ह्या दृश्य भावनांचे दुष्परिणाम आणि त्यातून प्रत्येक कृतीच्या वेळी तयार होणारा ताण हा टाळता येत नाही .या सर्व समस्या आणि त्यांचे महत्त्व हे मन साक्षरतेतूनच समजू शकते. त्यासाठी जागतिक मानसिक स्वास्थ्य दिन हा १० ऑक्टोबरला ज्ञानाचा साजरा करण्याचा दिवस म्हणून विषय जागतिक पातळीवर बनवण्यात आला आहे .आपण धार्मिक सण प्रथा यांना महत्त्व देतो. पण आपल्या मन स्वास्थ्या बद्दलची सजगता आपण निश्चितच बाळगण्यात कमी पडतो. असे म्हटले तर ते चूक ठरणार नाही. व्यक्तीच्या व्यक्तिमत्वात उफाळून येणारा राग, क्रोध आणि द्वेष हे काय आहेत .याचा जैविक शरीराच्या क्रियाशी काय संबंध असतो. यावरही जगात खूप विचार झाला पचनसंस्थेतील बदल आहार विश्रांती हे सर्व घटक क्रोध आणि द्वेष निर्माण करतात. असे आता सिद्ध झाले आहे. म्हणून स्वतःला या सगळ्या विकाराच्या परिणामापासून दूर ठेवण्यासाठी आपल्या जैविक वर्तन हेही समजावून घेण्याची गरज आहे आनंदाची भावना ही आकस्मात येत नाही. ती प्राप्त झाली तर ती दीर्घकाळ टिकत नाही .मनाचे आनंदी व्याकरण ही नवी संकल्पना असून ती आनंद प्राप्त करण्यासाठी स्वतःलाच मनपातळीवर आत्मसात करायला हवी आहे. मनसाक्षरता म्हणजे आनंदाचे व्याकरण होय .आनंदाचे व्याकरण म्हणजे जीवन ही एक संघर्षाची गोष्ट आहे. संघर्ष आढळ आहे. नैराश्याचे ढग जीवनात येणार या सगळ्या प्रसंगावर मात करणे. याशिवाय दुसरा मार्ग नाही आज दिवस जातील उद्या प्रकाशाचे दिवस येतील. नैराश्य हटून जाईल .आनंदाचे शीडकावे कधीतरी प्राप्त होतील. अशी एक मनाची समजूत करणे हेही आपल्या हातीच असते. दुसरा परिस्थितीचा मार्ग दिसत नाही .ते घटक आपल्या हातात नसतात. सतत स्वतःला चांगल्या विचाराच्या वातावरणात ठेवणे. मन त्यात गुंतवणे आणि स्वतःचे मन अवकाश स्वतःसाठी राखून ठेवणे इतरांचा श्रोता होयबा आज्ञाधारक होत राहणे. यातून स्वतःचे मन अवकाश मनचिंतनासाठी मन स्वास्थ्यासाठी मिळवले पाहिजे ते मिळत नाही .हे पण कळाले पाहिजे. म्हणून तर जागतिक मनस्वास्थ्य दिनाच्या निमित्ताने या मनसाक्षरतेचा आनंद साक्षरतेचा विचार साहित्य ,संगीत, कला ,नृत्य या सर्व क्षेत्रात होतो आहे ही एक सूचीनह असलेली गोष्ट आहे.

मनाची आनंद साक्षरता यासाठी मन खेळांची यादी बनवायला हवी .गाणे कोणते येकैन आहे .संगीत कोणत् येऐकन. याचे क्रम ठरवायला हवेत .त्याची यादी करायला हवी. कामातील बदल कसा करेन. ?नवे पर्यावरण सभोवतालचे बदलून कसा घेईन ?हे पण मन आनंदाच्या यादीमध्ये व्याकरणांमध्ये त्याचे क्रम ठरवता आले पाहिजेत. हे व्यक्तीला करता येणे म्हणजे मानसिक स्वास्थ्य निरोगी निरामय ठेवण्यासाठी आंतरिक स्वतःचा मन सोबती बनणे होय. प्रतिकूल क्षण नैराश्याच्या घटना न आवडणारे प्रसंग हे सतत असतात. अपमान ,उपेक्षा आणि भूतकाळाच्या कटू आठवणी या उफाळून येतात. पण यांना किती महत्त्व द्यायचे यासाठी वर्तनाचा लंबक दुसऱ्या दिशेला किती झुकू द्यायचा? याचा विवेक व्यक्तीला करता आला पाहिजे. यासाठी मनविवेक मनानंद साक्षरतेचा लगाम आहे हे पण समजावून घेतले पाहिजे. आनंदाला खूप भौतिक गोष्टी मिळाल्याचीच गरज नसते. सुखद्वा पक्ष्यांची शीळ, फुलपाखरांचे तैरणे, विविध आवाज संगीत ,त्यांची धून विविध व्यक्तींचे विचारपूर्वक संवाद, चांगले कथन चांगले, वाचन या छोट्या छोट्या गोष्टी माणसाच्या आनंद व्याकरणासाठी आवश्यक असतात. यामधून सुद्धा आनंदाचा विकास करता येतो. मन हीच आनंदाची बिज अवस्था आहे. स्वतःला एकांत मिळवणे एकांतात आपले मन

पर्यावरणातल्या घटकांशी जोडणे झाडांचे निरीक्षण पशुपक्ष्यांचे निरीक्षण आकाशातील ढगांचे बदल त्यांची गती यासाठी मन जोडून ठेवणे. इतके सामान्य प्रयत्न आणि प्रयोग प्रत्येक व्यक्तीला स्वतःसाठी करता आला काय ?सौंदर्यआणि निरपेक्षता कारुण्य आणि दुःख या भावनांच्याकडे आपण कसे पाहतो. यामध्ये आपली मनाची संतुलित तथा कितपतअवस्था आहे? आणि नाही हे मन साक्षरतेवरून आपणाला तपासता येते .यासाठीच जागतिक मानस उपचार तज्ज्ञांचा असा प्रयत्न असतो. की अंतरीक सगळे कड मोकळे करा .सांगत रहा. बोलत रहा काहीही अंदाज लागू न देणे हे स्वतः ला रोगी बनवणेअसते. निरामय मनाची अवस्था यातून तयार होत नाही. स्वतः तयार केलेली क्षमता असते. ती मनसिद्धता आणि साधना असते. यासाठी धार्मिकतेचा खूप काही परिणाम होत नाही. तरी दुसऱ्या बाजूला समजावून घेण्याची गरज आहे. डोळे मिटून एका श्रद्धेच्या समोर लीन होणे आणि कोणतीच क्रियात्मक सुधारण्याची मनपातळीवर कृती न करणे. हा शून्य अवस्थेचा प्रयत्न माणसाला भय ग्रस्त बनवतो. हेसिद्ध झाले आहे. म्हणून देऊळ मंदिर प्रार्थना चर्च विहार कडे आपने आपण जाणे आणि स्वतःला विशुद्ध भावनेतून शुद्ध होऊन परत येणे. असे घडत नाही. ही फक्त कृतक भावना असते. मन साक्षरता आणि श्रद्धा या गोष्टी पूर्णतः वेगळ्या असतात. श्रद्धेला हेतू काही क्षमता मूल्यांचा स्वीकार काही नसतं श्रद्धा निरर्थक उद्देश विहीन व अस्थिर असते. ती भयग्रस्त असते ती भीतीच्या साह्यानेच वर्तन करते नेणीव मानवी श्रद्धेला गतिमान करते. आणि म्हणूनच द्वेष उन्माद क्रोध आणि सूड या भावना मानवी वर्तनावर वाईट प्रभाव गाजवतात. आज समाजात याच प्रवृत्ती खूप बोकल्या आहेत. या वेगाने वाढत आहेत. आणि म्हणून दुभंगलेल्या व्यक्तिमत्त्वांचे परिणाम सतत वाढत आहेत इतरांचा द्वेष करणे क्रोध बाळगून वर्तन करणे सुडा साठी असत्य बोलावे. फसवणुकीसाठी समोरील व्यक्तीला कपटकारस्थानात अडकवणे. या प्रकारचे मानसिक वर्तन ही समाजाची मोठ्या प्रमाणात वर्तनपद्धती झाली आहे .याचे सर्व मूळ हे मन समजून घेतले नाही. हे आहे मन ही एक स्वतःची विवेक साध्य विकसित केलेली शक्ती आहे. त्या दृश्य आहे. ती नियंत्रित आहे .ती गतिमान आहे. तेच अस्तित्व आहे. तेच सामर्थ्य आहे. तोच विकास आहे. तीच विधायक आहे इतकी मनाची नव साक्षरता आपण प्राप्त करणे. हे मन आनंद व्याकरण समजून घेण्यासारखेच आहे. आपल्या पारंपारिक श्रद्धावर्तनात मनसाक्षरता आनंद लालचेचा आहे. तो नवस रूपाने वर्तन करतो. तो प्रसाद रूपाने वर्तन करतो. तो दानपेटीच्या रूपाने वर्तन करतो. असा लालची भक्तीभाव हा आपल्या मानसिक वर्तनाला निरामय बनवत नाही. हे आता भक्ती आणि मन आरोग्य शास्त्र या दोन्हीतील फरक समजावून घेतले पाहिजेत. भक्ती क्षेत्रातील आपला पवित्र भाव पूज्यभाव ही मनसाक्षरतेची गोष्ट क्वचितच असते. ती अंशतः साध्य पण होते, पण शास्त्रीय पद्धतीने मनानंद साक्षरता प्राप्त होणे .यातून अशक्य आहे. हे आधुनिक मानसशास्त्र नमूद करते आधुनिक मानसशास्त्रात मनाच्या असंख्य क्षमता वर्तन पद्धती आणि होणारे बाह्य घटकावरील परिणाम हे आता संशोधनाने समोर आले आहेत. ते मांडण्यात येत आहे. अजूनही मनाच्या तिन्ही काळातील वर्तनाचा निष्कर्ष मांडन्यात आलेला नाही परंतु वर्तमानातील मन आनंद व्याकरण समजावून घेणे. हे प्रत्येक व्यक्तीला सहज शक्य आहे. त्यासाठी मनानंदाची यादी बनवा मग छोट्या छोट्या आनंदी घटना प्रसंगाशी जोडून घ्या आणि मनाचा शोध स्वतःच स्वास्थ्यासाठी घेत राहा. बाह्य घटकांना नियंत्रित करा. आंतरिक त्यांचा प्रभाव आणि वेगाने होणारा आघात रोका. हे प्रत्येक व्यक्तीला करता आले पाहिजे. हाच खरे तर भारतीय पातळीवरचा जागतिक मनो आरोग्य दिनाचा संदेश होय तोच १० ऑक्टोबर २४ रोजी जगातील ज्ञान दिवस मनसशास्त्रीय क्षेत्रात मानला गेला आहे..

**– शिवाजी राऊत**
**सातारा**

# समता स्वातंत्र्य न्याय बंधुता व मानवतेच्या जन कल्याणासाठी बाबासाहेबांनी धम्मक्रांती केली : पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्ते परिवर्तनवादी विचारातून घडतात आणि त्यांना खुप मोठी प्रेरणा मिळते . कारण

### नळदुर्ग येथे धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात साजरा

शैक्षणिक , राजकीय, सांस्कृतिक सामाजिक आणि संस्कारासाठी धार्मिक प्रेरणा महत्वाची आसते म्हणून तथागताचा धम्म हा मानवी कल्याणाचा खुप मोठा खजाना आहे समता स्वातंत्र्य न्याय व बंधुता आणि त्यांची निती नवमुल्यदृष्टी निर्माण करणारी धम्मक्रांती डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी विजया दशमीच्या दिनी घडवुन आणली बौद्ध धम्म हा कल्याणाचा मार्ग सांगतो तो धम्म संस्कारक्षम पिढी निर्माण करणारा आहे तो अचरणात आनावा आसे परखड मत नळदुर्ग ठाण्याचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांनी केले.

नळदुर्ग डॉ आंबेडकर नगर मध्ये धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करण्यात आला त्यावेळेत प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते . कार्यक्रमाचे प्रास्ताविक बौद्धाचार्य दादासाहेब बनसोडे यांनी केले या नंतर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे व त्यांच्या पत्नी शितलताई गजेंद्र सरोदे यांचा सत्कार बौद्धाचार्य तथा पत्रकार दादासाहेब बनसोडे यांनी केले. यावेळी शितलताई गजेंद्र सरोदे पार्वती वाघमारे , मनिषा कांबळे , सांची बनसोडे , पुजा बनसोडे , रोहीणी बनसोडे , सुजाता कांबळे , यशोदा बनसोडे, गोपाबाई कांबळे , शिलाबाई वाघमारे , नानिमॉ कांबळे , शिताबाई चिमणे, आदिजन उपस्थित होते.

प्रथमता पाहुण्यांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचं पुजन करण्यात आले . बौद्धाचार्य दादासाहेब बनसोडे यांच्या हस्ते पंचशिल ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले . यावेळी निलेश बनसोडे , प्रशिक बनसोडे ,



कार्तिक बनसोडे , साहील बनसोडे , अतिश वाघमारे , प्रजित सुरवसे , प्रबुद्धपाल बनसोडे , ओम गायकवाड , महेश गायकवाड अमर कांबळे , अतिश बनसोडे अतिश कांबळे , नामदेव बनसोडे ओमप्रकाश बनसोडे , सुभाष कांबळे , विद्यासागर कांबळे आदिजन उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार दादासाहेब बनसोडे यांनी मानले .

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### पत्नीच्या गळ्यातील मंगळसूत्र घेऊन वडिलांच्या खिशातील रक्कम काढून जिवे मारण्याची धमकी; मुलाविरुद्ध गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : खर्चासाठी पैसे नसल्याने पत्नीच्या गळ्यातील मंगळसूत्र व वडिलांच्या खिशातील रोख रक्कम बळजबरीने काढून मारहाण करून तुम्ही पोलिसात तक्रार दिला तर तुम्हाला खल्लास करून टाकतो अशी जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी वडिल मारुती यंकप्पा श्रीराम (वय-४८-,रा.मौलाली चौक,कोंची कोरवे नगर) यांनी मुलगा सचिन मारूती श्रीराम याच्याविरूध्द सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. ही घटना १२ ऑक्टोंबर रोजी सायंकाळी मौलाली चौक येथे घडली. या घटनेचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक काटे हे करीत आहेत.

### लग्नात मानपान केला नाही म्हणत विवाहितेचा छळ करत मारहाण; पती सहा जणांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : सासरकडच्या मंडळींनी संगणमत करून विवाहितेला तुझ्या आई-वडिलांनी आम्हाला लग्नात काही मान केला नाही, तु पतीस घटस्फोट दे व आम्हास मोकळे कर, तू येथून निघून जा, जर तू नांदण्यास आली तर आम्ही तुला त्रास देऊन नांदवणार नाही असे म्हणून शारीरिक व मानसिक त्रास दिला.तसेच पतीने हाताने व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. अशा आशयाची फिर्याद कविता संजीवकुमार पवार (वय-२३,रा.हनुमान मंदिर जवळ दंडोती,ता.चितापूर जि.कलबुर्गी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती संजीवकुमार भारत पवार, सासू रमिता भारत पवार, सासरे भारत अर्जुन पवार, दीर राजकुमार भारत पवार, जाऊ अनुषा राजकुमार पवार (रा.सर्व.हनुमान मंदिर जवळ दंडोती तालुका चितापूर जिल्हा कलबुर्गी) व नणंद इंदिरा अनिल सुर्यवंशी (रा.हैद्राबाद) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना १२ मे २०१९ ते २७ सप्टेंबर २०२४ दरम्यान फिर्यादी यांच्या सासरी घडली. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार गायकवाड हे करीत आहेत.

### म्हशी आडव्या आल्याने माल ट्रकची कारला धडक

सोलापूर, (प्रतिनिधी) : म्हशी आडव्या आल्याने कारचालकाने अचानक ब्रेक दाबल्याने मागील माल ट्रक चालकाने कारला धडक देऊन ८० हजाराचे नुकसान केल्याप्रकरणी एकाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि घटना ११ ऑक्टोंबर २०२४ दरम्यान ३.५० वाजण्याच्या सुमारास जुना पुणे नाका येथे घडली.याप्रकरणी राकेश रामकृष्ण माकोडे (वय-४४,रा. समता कॉलनी,पीडब्ल्यूडी ऑफिस शेजारी,धाराशिव) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून गोपाळ नागप्पा क्यासे (वय-५७,रा. कवडयाळ,ता.बसवकल्याण,जिल्हा बिदर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी हे गांधी शोरूम पुणे रोड येथून धाराशिवला जात असताना अचानक फिर्यादी यांच्या कारच्या समोर म्हशी आल्याने फिर्यादी यांनी ब्रेक लावून त्यांची कार थांबवली. त्यावेळी फिर्यादी यांच्या कारच्या पाठीमागून भरधाव वेगात येणारा माल ट्रक क्रमांक केए.५६.२५०४ यातील ट्रकचालकाने त्याच्या ताब्यातील ट्रक निष्काळजीपणाने चालून कारला धडक देऊन ८० हजार रुपयांचे कारचे नुकसान केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. तपास पोलीस हवालदार घुगे हे करीत आहेत.

# मंदिर जतन संवर्धनाची कामे पुरातत्व विभाग, संबधित कंत्राटदारानी वेळेत पूर्ण करावीत

## मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांची सूचना

## आराखड्यातील कामांचा अहवाल जिल्हाधिकारी सोलापूर व पुरातत्त्व विभागास देणार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिराचे जतन व संवर्धनाचे काम पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली शासन निधीतून सुरू आहे. पुरातत्त्व विभाग व संबधित कंत्राटदारानी सदर कामास गती देऊन वेळेत व गुणवत्तापूर्ण कामे करावीत. तसेच आराखड्यातील काम अत्यंत संथगतीने सुरू असल्याने सदर कामाबाबत जिल्हाधिकारी सोलापूर व पुरातत्व विभाग यांना अहवाल सादर करण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीची सभा दिनांक १३ ऑक्टोंबर रोजी सकाळी ११ वाजता श्री विठ्ठल रुक्मिणी भक्त निवास येथे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी मंदिर समितीचे सदस्य शकुंतला नडगिरे, डॉ. दिनेशकुमार कदम, भास्करगिरी महाराज, संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर, ह.भ.प.शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, पुरातत्व विभागाचे सहायक संचालक डॉ. विलास वाहणे, वास्तुविशारद, ठेकेदार तसेच सर्व विभागाचे खाते प्रमुख उपस्थित होते.

या सभेत मंदिर संवर्धन व जतन कामाबाबत सुरू असलेल्या कामाचा आढावा घेण्यात आला. तसेच श्रींच्या दर्शनरांगेत स्कायवॉक व दर्शनहॉल बांधकाम करणेकामी शासनाने निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल एकनाथजी शिंदे, मुख्यमंत्री, देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री, अजितजी पवार, उपमुख्यमंत्री, सुजाता सौनिक, मुख्य सचिव व महाराष्ट्र शासनाच्या अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यात आला. तसेच कार्तिकी एकादशी दि.१२ नोव्हेंबर रोजी संपन्न होत आहे. या दिवशी पहाटे २.२० वाजता उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व मानाचे वारकरी यांचे शुभहस्ते सपत्नीक श्रीची शासकीय महापुजा केली जाणार आहे. या यात्रा कालावधीतील श्री.विठ्ठल रुक्मिणी मंदिराशी संबंधित असलेल्या प्रथा व परंपरा तसेच भाविकांना देण्यात येणाऱ्या सोई सुविधांचा आढावा घेण्यात आला. परंपरेनुसार दि. ०४ नोव्हेंबर रोजी श्रींचा पलंग काढून प्रक्षाळपुजेपर्यंत म्हणजे दि. ०४ ते २० नोव्हेंबर दरम्यान २४ तास श्रींचे दर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच मागील वर्षीप्रमाणे पत्राशेड येथे पूर्णवेळ अन्नछत्र सुरू करणे तसेच यात्रेच्या अनुषंगाने विविध सोई सुविधांचा आढावा घेऊन भाविकांना पुरेसा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्याचे ठरले.

> ■ कार्तिकी यात्रेत भाविकांना पुरेसा प्रमाणात सोई सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन,
> ■ दि. ०४ ते २० नोव्हेंबर दरम्यान २४ तास दर्शन,
> ■ स्कायवॉक व दर्शनहॉलला निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व शासनाच्या आभाराचा ठराव पारीत,
> ■ मंदिर समितीची कार्तिकी यात्रा व आराखड्यातील कामांबाबत आढावा बैठक संपन्न,

धर्मादाय आयुक्त यांनी नुकतीच अनुकंपा तत्वावरील नियमावलीस मंजुरी दिली आहे, या नियमावलीनुसार अमोल चंद्रकांत वाडेकर, अशोक विठ्ठल कोले, सुनिता अरूण माळवदकर, अभिमन्यू रंगनाथ क्षिरसागर या आस्थापनेवरील आकस्मित मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना सेवेत समाविष्ट करून घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच धर्मादाय आयुक्त यांच्या मान्यतेनुसार आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांचे सेवा निवृत्तीचे वय ५८ वरून ६० वर्षे करण्यात आले. तसेच विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास, वेदांता भक्तनिवास व व्हिडीओकॉन भक्तनिवासाच्या ठिकाणी सोलार प्लॉन्ट बसविणे, मंजुर २७० पदांच्या आकृतीबंधातील रिक्त पदे भरती करणेकामी बिंदुनामावली व सेवा प्रवेश नियमावली तयार करणे, एमटीडीसी भक्तनिवासाचा करार वाढवून घेणे, यमाई तुकाई मंदिर पंढरपूर येथील जागा मागणीचा प्रस्ताव शासनास सादर करणे, नामदेव पायरी येथील दरवाज्याला दानशुर भाविकांमार्फत मोफत चांदी मढविणे, रक्षक सिक्युरिटी कंपनीच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने समिती गठीत करणे, मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांना महाराष्ट्र रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव पारीत करणे इत्यादी महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.

याशिवाय, महाराष्ट्राला वारकरी संप्रदाय व महान संत परंपरा आहे. या परंपरेतील साहित्य, संस्कृती, परंपरा, कला इ. ना एकत्र आणून एक हक्काचे व्यासपीठ देणारा प्रकल्प जो शासन व जनमानसाला सुध्दा उपयुक्त ठरेल. यादृष्टीने संतांची भूमी असलेल्या महाराष्ट्रातील प्रमुख ठिकाणी म्हणजेच पंढरपूर (श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर), आळंदी (श्री संत ज्ञानदेव), त्र्यंबकेश्वर (श्री संत निवृत्तीनाथ), सासवड (श्री संत सोपानदेव), मुक्ताईनगर (श्री संत मुक्ताबाई), पैठण (श्री संत एकनाथ) व देहू (श्री संत तुकाराम) येथे कम्युनिटी रेडिओ प्रवर्तित करण्याचा मंदिर समितीचा मानस आहे. या सर्वांचे पालकत्व व नेतृत्व करण्यास श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती तयार आहे. संतवाणी रेडिओ व ॲपद्वारे जगभरात आपणास महाराष्ट्रातील संतवाड़:मय पोहचविता येईल. सदरचा प्रकल्प राबविण्यासाठी सदर विषय तिर्थक्षेत्र विकास आराखड्यात समाविष्ट करणेकामी जिल्हाधिकारी, सोलापूर यांना प्रस्ताव सादर येणार असल्याची माहिती यावेळी सह अध्यक्ष औसेकर यांनी दिली.

# ॲड. राहुल मखरेंची राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस व प्रवक्तापदी नियुक्ती

## प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी दिले नियुक्तीचे पत्र

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



इंदापूर, (प्रतिनिधी) : अतुल सोनकांबळे (दि.१३) ड. राहुल मखरे यांना महाविद्यालयीन काळापासून सामाजिक कामाची आवड आहे. अविरत काम करून तरुण पिढीचे नेतृत्व करत शिव,शाहू फुले,आंबेडकर चळवळीच्या माध्यमातून व सामाजिक कामातून तरुण वर्ग ड.राहुल मखरेंच्या नेतृत्वाकडे आकर्षित झाला आहे. कोरोना काळात गोरगरिबांना अन्नधान्य, वैद्यकीय आदी मदत सामाजिक जाणीवेतून ड.राहुल मखरे यांनी केली. गोरगरिबांचे प्रश्न सोडवण्यासाठी विनामूल्य वकीली आजतागायत करत आहे. सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून भीमा कोरेगाव चौकशी आयोगात विनामूल्य विधीज्ञ म्हणून ड. राहुल मखरे महत्त्वाची भूमिका बजावत आहे. ॲड.राहुल मखरेंनी दि.३० सप्टेंबर २०२४ रोजी पुणे येथील निसर्ग मंगल कार्यालयात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार) अध्यक्ष शरदचंद्रजी पवारसाहेब, पक्षाचे पुणे जिल्हाध्यक्ष जगन्नाथ (बापू) शेवाळे व हजारो समर्थकांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. सामाजिक काम करण्याची जिद्द पाहून थेट राज्य पातळीवर सरचिटणीस व प्रवक्ता म्हणून पक्षाच्या माध्यमातून काम करण्याची संधी ड. राहुल मखरे यांना प्राप्त झाली आहे. या नवीन जबाबदारीसह नव्या आव्हानांना पेलवत आगामी विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून पक्षाची वाटचाल अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्न करणार आहे, त्याचबरोबर इतर महत्त्वाचे प्रश्न हे प्रदेश स्तरावरून सोडवण्यासाठी भर देणार आहे. असे नियुक्तीनंतर पत्रकारांशी संवाद साधताना ॲड. राहुल मखरे यांनी म्हटले आहे.



ॲड. राहुल मखरे यांना नियुक्तीचे पत्र प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सुपूर्द केले आहे. ॲड. राहुल मखरे यांचे सर्वत्र कौतुक, अभिनंदन होत आहे.

# विजय पांढरे यांची कृषी उपसंचालक (मुकुसे वर्ग १) पुणे पदावर बढती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर, (प्रतिनिधी) : महाराष्ट्र शासन कृषी विभाग मंत्रालय मुंबई यांनी नुकत्याच दि११ ऑक्टोंबर २०२४ रोजी निर्गमित केलेल्या शासन आदेशानुसार वेळापूर येतील श्री विजय सावळा पांढरे यांना कृषी उपसंचालक (, मुकुसे वर्ग१ कृषी आयुक्तालय ) पुणे या पदावर भरती देण्यात आली आहे. शासन आदेशानुसार कृषी विभागातील ४७ तालुका कृषी अधिकारी/ तंत्र अधिकाऱ्यांना वर्ग १ या पदावर पदोन्नती दिले आहेत.

शासकीय माळशिरस तालुक्यातील प्रसिद्ध असलेल्या बोरगाव माळवाडी या गावात त्यांचा जन्म झाला शया कनिष्ठ पदावरी उन्नतीमुळे येथील प्रशासकीय सेवेच्या दैदीप मान वर्षा असणाऱ्या पांढरे घराण्याच्या शिरपेचात आणखी मानाचा कमी शेती क्षेत्र आर्थिक परिस्थितीवर मात मात करून पांढरे घराण्यातील बहुतांश विद्यार्थ्यांनी चांगल्या खाद्य नको रे व शासकीय सेवेतील पोलीस प्रशासन कृषी विभाग अशा सर्व शेतात नाव कमावले आहे. श्री विश्वास पांढरे वापोसे कल्याण पांढरे उपजिल्हाधिकारी काही दीपक मसोडे उपायुक्त अशोक पवार पोलीस उपाधीक्षक वैज्ञानिक कॉन्फरन्सिंग लॅब नावलौकिक मिळवत असताना दरवर्षी बरेच प्रशासकीय अधिकारी बोरगाव माळेवाडी या गावातून तयार होत असतात.

संघर्ष करून श्री विजय पांढरे कृषी महाविद्यालय हे शिक्षण महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथे झाले हे शिक्षण पूर्ण करत असतानाच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची २०१२ मध्ये पोलीस उपनिरीक्षक पद २०१३ मध्ये अधिकारी या पदावर सन २०१३ पासून ते११.५ वर्ष पूर्ण केल्यानंतर सेवा जेष्ठानुसार कृषी उपायुक्तलय. पुणे या पदावर पदोन्नती झाली आहे. त्यानिमित्त पुढील वाटचाली त्यांना शुभेच्छा देत आहोत.

# सिन्नूर येथे ६८ वा धम्मचक्र परिवर्तन दिन व अशोक विजयादशमी मोठ्या उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधानी, (प्रतिनिधी) : अक्कलकोट तालुका मधील सिन्नूर या गावात ६८ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन व अशोक विजयादशमी मोठ्या उत्साहात साजर करण्यात आला. सर्वप्रथमता तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन जयभीम तरुण मंडळ सिन्नुरचे पदाधिकारी हुचप्पा कांबळे यांच्या हस्ते करण्यात आला.ध्वजारोहण चंद्रकांत कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी धर्मा मांग, कैलास सोनकांबळे, बसापा सोनकांबळे,कल्लाप्पा सोनकांबळे, कंतेप्पा कांबळे, शिवप्पा सोनकांबळे, शानाप्पा दिदिमानी, संगाप्प सोनकांबळे, सिद्धा मांग व जय भीम



तरुण मंडळा चे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपसथित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.जयकुमार सोनकांबळे यांनी केले.

**भाई नितीन काळे यांच्या पाठपुराव्यास मोठे यश**

**धनगर समाज बांधवांकडून आभार व्यक्त**

# सोलापूर जिल्ह्यातील १७८६ धनगर समाजाच्या घरकुलचा प्रश्न मार्गी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : सोलापूर जिल्ह्यातील धनगर समाजासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेतील पात्र लाभार्थीसाठी पाठपुराव्या अभावी फाईल पेंडिंग पडली होती. याबाबत भाजप युवा मोर्चाचे प्रदेश सचिव नितीन काळे यांनी केलेल्या प्रयत्नाला मोठे यश मिळाले असून सोलापूर जिल्ह्यातील १७८६ लाभार्थी यांच्यासाठी ११आक्टोबर रोजी राज्य शासनाने नव्याने जी.आर. काढला आहे. यामुळे वरील लोकांची घरकुल योजना मार्गी लागणार आहे.

नुकत्याच मागील काही महिन्यापूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीपूर्वी वरील घरकुल योजनेचे अर्ज मागविण्यात आले होते. त्यामधून सोलापूर जिल्ह्यातील १७८६ लाभार्थी पात्र झाले होते. सदरची बैठक होताच लोकसभा निवडणूक आचारसंहिता लागल्याने फाईल अडकली होती. याबाबत जिल्ह्यातील पालकमंत्री आणि आमदार यांनीही या प्रश्नासाठी कसलाही पाठपुरावा केला नव्हता. याबाबत अनेक प्राप्त लाभार्थी यांनी समाजसेवक आणि सत्ताधारी भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सचिव नितीन काळे यांना तोंडी सांगितले. याबाबत काळे यांनी सोलापूर येथील संबंधित विभागाकडे त्याबाबत चौकशी केली. यासाठी लागणारी महत्त्वपूर्ण कागदपत्रे आपल्या सोबत घेत. थेट मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. या फाईलबाबत तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या होत्या. त्यानंतरही फाईल परत पुढे सरकली नव्हती.

> **गरीब समाजासाठी केलेला प्रश्न सुटला**
>
> मी धनगर समाजाचा आहे. आपण सत्ताधारी भाजप पक्षातील एका पदावर आहोत. याचा उपयोग किमान आपल्या धनगर समाजासाठी व्हावा. यासाठी आपण मोठा पाठपुरावा करून गरीब धनगर समाजातील निवाऱ्याचा प्रश्न मार्गी लावू शकलो यामध्ये आपणाला फार मोठे समाधान मिळत आहे. अशी प्रतिक्रिया नितीन काळे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले. हे यश माझे तर आहेच परंतु संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी खूप मोलाचे सहकार्य केले आहे. असेही त्यांनी म्हंटले आहे. समाजाच्या न्याय हक्कासाठी कायमच लढत राहणार. यासाठी त्यांनी विशेष आभार म्हणून इतर मागास बहुजन कल्याण मंत्री ना.अतुल सावे व आ. रामराव वडकुते यांचेही आपण समाजाच्या वतीने आभार व्यक्त करीत असल्याचे सांगितले आहे.

मागील आठवड्यात परत एकदा नितीन काळे यांनी मुंबईत तळ ठोकून याबाबत मोठाच पाठपुरावा सुरु ठेवला. इतर मागास बहुजन कल्याण विभाग मंत्रालय मुंबई येथे मंजूरीसाठी पाठविण्यात आली होती. परंतु त्याठिकाणी पाठपुरावा कोणीही करत नसल्याने, ही लाभार्थी यादी तशीच मंजुरीसाठी मंत्रालयात पडुन राहीली होती. ही बाब नितीन काळे यांच्या लक्षात येता त्यांनी राज्यांचे मुख्यमंत्री



एकनाथजी शिंदे व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्याकडे सतत पाठपुरावा केला. मुख्यमंत्री यांनी इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव यांनाही तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश दिले. त्यानंतरही अनेक महीने कालावधी झाल्यानंतरही मंजुरी देण्यात आली नव्हती.

भाजपचे नेते नितीन काळे यांनी सातत्याने मंत्रालयात पाठपुरावा केल्यानेच त्यांच्या प्रयत्नाला अखेर मोठे यशच म्हणावे लागेल.या बाबत त्यांचे धनगर समाज बांधवांकडून आभार व्यक्त केले आहे.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...

### अज्ञात चोरट्याने पळवला मोबाईल

सोलापूर, (प्रतिनिधी) : रेल्वे स्टेशन येथील महात्मा गांधी पुतळ्या सर्कल समोर गाणगापूर बस मध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन फिर्यादी सुनील रमेश पवार (वय-४१,रा.इंद्रायणी नगर,भोसरी,पुणे) यांच्या खिशातील १४ हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेला आहे.ही घटना १५ सप्टेंबर रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी सुनील पवार यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार चव्हाण हे करीत आहेत.

### सेलिब्रेटलार्ज नवीन अभियान सुरु

सोलापूर : भारतात उत्सवाच्या जल्लोषाला प्रारंभ करतांना,रॉयल स्टॅग पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरने सेलिब्रेटलार्ज हा नवीन अभियान सुरु केला आहे.अभियानाचा टॅगलाइन-'जनरेशन लार्ज का सेलिब्रेशन लार्ज' युवा पिढीच्या या इच्छेला ब्रँडच्या 'लिव्ह इट लार्ज' तत्त्वज्ञानासोबत सुंदरपणे जोडतो. या अभियानात भारताचा टी२० क्रिकेट कप्तान सूर्यकुमार यादव याचा समावेश आहे आणि हे एक एंगेजमेंट-केंद्रित ३६० डिग्री अभियान आहे,ज्यामध्ये एक इंटरएक्टिव एआय फिल्म, एक नव-ोन्मेष एआर -सक्षम उत्सवी कॅनवास आणि भारतीय क्रिकेट सुपरस्टार सूर्यकुमार यादव याच्यासोबत उत्सव साजरे करण्याची संधी समाविष्ट आहे.

### प्राथमिक समभाग विक्री १५ ऑक्टोबरपासून

सोलापूर : क्रिसिल अहवालानुसार वर्ष २०२३ मधील प्रवासी वाहनांच्या विक्रीवर आधारित जगातील तिसरी सर्वात मोठी ऑटो ओईएम असलेल्या हुंडाईची मोटर ग्रुपचा एक भाग हुंडाईची मोटर इंडिया लिमिटेड मंगळवार,१५ ऑक्टोबर रोजी इक्विटी शेअर्सची (ऑफर) प्राथमिक समभाग विक्री सुरू करण्याचा प्रस्ताव ठेवत आहे.प्रमुख गुंतवणूकदाराच्या बोलीची तारीख बीड ऑफरच्या एक कार्यालयीन दिवस आधी म्हणजेच सोमवार,१४ ऑक्टोबर असणार आहे.बोली/ऑफर गुरुवार,१७ ऑक्टोबर रोजी बंद होईल.प्रती इक्विटी शेअरसाठी १८६५ रुपये ते १९६० रुपयांपर्यंतचा किंमतपट्टा निश्चित करण्यात आला आहे.

# उगाव रोडवर भरधाव वाहनाच्या धडकेत एक मुलगी जखमी तर एकीचा दुर्दैवी मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड, (प्रतिनिधी) : निफाड उगाव रोडवर बेघर वस्ती येथील दोन छोट्या मुली दसऱ्याच्या दिवशी मैत्रिणी समवेत दुपारच्या वेळी जवळच असणाऱ्या वसंत बंधारा येथे कपडे धुण्यासाठी गेल्या होत्या घरी परत येत असतांना उगाव रोड नजिक असणाऱ्या काट्या मारुती मंदिरासमोर या मुलींना अज्ञात वाहनाने धडक दिली व वाहन चालक गाडी घेऊन फरार झाला असून या धडकेत एका नऊ वर्षाच्या मुलीचा मृत्यू झाला असून एक जखमी झाली आहे दसरा सणाच्या दिवशी दुपारी ही दुर्दैवी घटना घडली आहे.

सविस्तर वृत्त असे की उगाव रोडवरील बेघर वस्ती येथील गरीब कुटुंबातील कु. रेणुका दीपक पवार (वय नऊ) वर्ष ही आपल्या मैत्रिणी समवेत दुपारच्या वेळी जवळच असणाऱ्या वसंत बंधारा येथे कपडे धुण्यासाठी गेली होती.

कपडे धुऊन झाल्यानंतर घरी परत येत असताना उगाव रोडवर काट्या मारुती मंदिरासमोर भरधाव वेगाने येणाऱ्या एका चार चाकी अज्ञात वाहनाने कु.रेणुका दीपक पवार व लक्ष्मी भाऊराव माळी (वय दहा) वर्ष या दोन मुलींना धडक दिली असून या मध्ये रेणुका दिपक पवार हिचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

तर लक्ष्मी भाऊराव माळी ही जखमी झाली असून तिचे वर उपचार सुरू आहे या दुर्दैवी घटनेने सर्वत्र हळह व्यक्त केली जात असून सदर घटनेचा तपास निफाड पोलीस स्टेशनचे पीआय गणेश गुरव यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस करत आहे,

# रिपब्लिकन पक्षाच्या (आठवले) पुरंदर तालुका अध्यक्षपदी बळीराम काळूराम सोनवणे यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

डॉ विनायक गायकवाड /पुरंदर प्रतिनिधी : पुरंदर तालुक्यातील सोनोरी गावचे सुपुत्र व रिपब्लिकन पक्षाचे एकनिष्ठ कार्यकर्ते सासवड शहर रिपब्लिकन पक्षाचे माजी अध्यक्ष व रिपब्लिकन चळवळीचे सक्रिय कार्यकर्ते यांना रिपब्लिकन पक्षाचे जिल्हा अध्यक्ष मा. श्रीकांत कदम साहेब यांनी निवडीचे पत्र दिले. त्यांच्या निवडिमुळे रिपब्लिकन पक्षाच्या पुरंदर तालुक्यातील कार्यकर्त्यांमध्ये चैतन्याचे वातावरण तयार



झाले आहे.पुरंदर तालुक्यामधून त्यांचे सर्व स्तरातून स्वागत व अभिनंदन होत आहे.निवडीनंतर बळीराम सोनवणे यांनी सांगितले कि प्रथम गावोगावी रिपब्लिकन पक्षाच्या शाखा व सर्वसामान्य जनतेच्या आदिअडचणी ला व पक्ष वाढीला प्राधान्य देणार.

# डॉ. धबाले यांना रमणश्री शरण पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अखिल भारतीय शरण साहित्य परिषद व रमणश्री प्रतिष्ठान बेंगलोर यांच्याकडून देण्यात येणाऱ्या या वर्षाचे रमणश्री शरण पुरस्कार घोषित झाले आहे.



येथील खेडगी महाविद्यालयातील कन्नड विभाग प्रमुख डॉ. गुरुलिंगप्पा धबाले यांना हा पुरस्कार घोषित झाले आहे. १८ नोव्हेंबरला बेंगलोर येथे होणाऱ्या कार्यक्रमात हा पुरस्कार देऊन धबाले यांना सन्मानित करणार आहे. चाळीस हजार रुपये रोख सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे.

डॉ.धबाले अक्कलकोट व सोलापूर येथील सीमा वरती भागात गेल्या ३० वर्षापासून आपले महाविद्यालयाचे काम काज करीत शरण साहित्याचे प्रचार , प्रसार व लेखन केलेले आहे. आतापर्यंत त्यांचे २४ पुस्तके प्रकाशित झाले आहे. कलबुर्गी आकाशवाणी मध्ये त्यांचे चिंतन प्रसारित झाले आहे. राष्ट्रीय व राज्यस्तरीय चर्चासत्रामध्ये त्यांनी भाग घेऊन संशोधनात्मक प्रबंध त्यांनी सादर केलेल्या आहे. कन्नड दूरदर्शन चैनल वर त्यांचे मुलाखत प्रसारित झाले आहे.

सोलापूर विद्यापीठामध्ये मार्गदर्शक म्हणून काम करीत कित्येक विद्यार्थ्यांना संशोधन करण्यासाठी मार्गदर्शन केले आहे. कर्नाटक व महाराष्ट्रातील विविध विद्यापीठाचे अभ्यास मंडळाचे त्यांनी सदस्य म्हणून काम करीत आहे.अद्याप पर्यंत विविध संस्थेकडून त्यांना एकूण १० प्रतिष्ठित पुरस्कार मिळाले आहे.

हा रमणश्री प्रतिष्ठित पुरस्कार मिळाल्याबद्दल खेडगी महाविद्यालचें प्राचार्य,प्राध्यापक वर्ग अध्यापकेतर कर्मचारी, जागतिक लिंगायत महासभा सोलापूर जिल्ह्याचे अध्यक्ष शिवानंद गोगाव सहित अनेक लोकांनी अभिनंदन केले आहेत

# भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील विकास कामांचे आमदार मोरे यांच्या हस्ते उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील विविध गावातील विकासकामांचे आमदार शांताराम मोरे यांच्या हस्ते उत्साहात उद्घाटन करण्यात आले.

पडघ्याजवळील गृप ग्रामपंचायत कुंरूद हद्दीतील वाहुली, आंबेडकर नगर, कुंरूद, वाफाळे, दळेपाडा येथील आमदार शांताराम मोरे यांच्या प्रयत्नाने आमदार व विविध मंजूर निधीतून बनविण्यात आलेले सिमेंट कॉक्रींट, पेव्हर ब्लॉक रस्ते, विधीघाट, समाजमंदिर, स्मशानभूमी कांमाचे तसेच गृप ग्रामपंचायत राहुर हद्दीतील तुळशी येथील नदीवरील ब्रीज, रस्त्यांचे उद्घाटन



आमदार शांताराम मोरे, ठाणे जिल्हा मजुर फेडरेशनचे माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक पंडीत पाटील यांच्या हस्ते शनिवारी करण्यात आले तर संपुर्ण खराब झालेला व नवीन रस्ता बनवण्यासाठी नागरिकांची सातत्याने मागणी होत असलेल्या पडघा पाच्छापुर रस्त्यावरील पडघा - शिरगांव रस्त्यासाठी २५ कोटी व शिरगांव - कासणे रस्त्यासाठी २५ कोटी रूपयांचा निधी आमदार मोरे यांनी मंजूर केल्याने या रस्त्याच्या कामाचे भुमीपुजन आमदार शांताराम मोरे, पंडीत पाटील यांच्या हस्ते शिरगांव चौकात श्रीफळ वाढवुन करण्यात आले.

यावेळी भाजयुमो माजी जिल्हाध्यक्ष श्रीकांत गायकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सचीन पाटील, पंचायत समितीचे माजी उपसभापती गुरूनाथ जाधव सरपंच दीपाली केदार, योगीता जाधव उपसरपंच कल्पना जरे उपतालुकाप्रमुख व ग्रामपंचायत सदस्य योगेश पाटील, युवा पदाधिकारी अजय मोरे, कुंरूद सेवा सोसायटीचे संचालक भगवान सांबरे, टीडीसी बँकेचे माजी संचालक विकास पाटील, उपतालुकाप्रमुख भगवान भोईर, ग्रामपंचायत सदस्य भाई पाटील, जान्हवी पाटील, संदीप काठोळे, विनोद पाटील, रविंद्र विशे समाजसेवक दीलीप केदार जगदीश पाटील, योगेश जाधव, अभिनव पाटील, सुभाष पाटील उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विलास पाटील यांनी केले.




# शेटफळगढे येथील नागरिकांचा नेत्र तपासणी शिबिरास प्रचंड प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : इंदापूर तालुक्यातील शेटफळगढे येथे माजी बांधकाम आरोग्य सभापती जिल्हा परिषद पुणे श्री प्रविण माने यांच्या संकल्पनेतून राबवण्यात आलेल्या नेत्र तपासणी शिबिरास शेटफळगढे व परिसरातील नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने सुरवात झाली. शेटफळगढे नागेश्वर मंदिर येथे सकाळी दहा ते पाच या वेळेत ९३५ नागरिकांनी नेत्र तपासणी करून घेतली असून यातील ६४२ नागरिकांना चष्मे वाटप करण्यात आले तर १६ नागरिकांची पुणे भारती विद्यापीठ येथे शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

शेटफळगढे येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे सुरज मचाले, गजानन पिसाळ, प्रीतम अवचट, विनोद शिंदे, निलेश रंधवे, छगन बनसुडे, अंकुश दोरकर, डॉ. शरद शिर्के, डॉ. तमन्ना मॅडम, डॉ. रणवरे, डॉ. शेख यांनी आयोजन केले होते.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने हनुमंत आण्णा वाभळे, लक्ष्मण तात्या साळुंखे, अमोल मचाले, दादा थोरात, शिवाजी मचाले, आकाश बंडगर, रघुनाथ वाबळे, हेमंत सवाणे, भगवान खारतोडे, बाळासो वाबळे, प्रकाश वाबळे, सुरेश गुरव, नारायण मचाले, महादेव झगडे, पोपट मचाले, अमोल झगडे, स्वप्निल वाबळे, शिवाजी जगताप, दिलावर तांबोळी, दादा जाधव, पोपट भगत, सचिन साळुंखे, प्रदीप मात्रे, बाळा सवाणे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# वंचित बहुजन आघाडी अक्कलकोट संपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट (प्रतिनिधी)- आज अशोक विजयादशमी आणि धम्मचक्र परिवर्तन दिनाच्या निमित्त तसेच दसरा सणानिमित्त अक्कलकोट वंचित बहुजन आघाडी च्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन वंचित बहुजन आघाडीचे सोलापूर जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडी खांबे यांच्या हस्ते करण्यात आला. विधानसभा २०२४ निवडणुकीचे पडघम चालू असताना अक्कलकोट वंचित बहुजन आघाडी मोठ्या ताकदीने ही निवडणूक लढवणार असून आत्तापर्यंत पूर्ण तालुक्याचा दौरा जनसंवाद यात्रेच्या माध्यमातून पूर्ण करण्यात आला असून कार्यकर्त्यांनी एकत्र बसून संघटन मजबूत करण्यासाठी



विचारांची देवाण-घेवाण करण्यासाठी संपर्क कार्यालयाची अत्यंत गरज आहे असे मनोगत जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडी खांबे यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी वंचित बहुजन युवक आघाडी तालुका अध्यक्ष शिलामणी बनसोडे कामगार संघटनेचे तालुका अध्यक्ष सिद्धार्थ बनसोडे तालुका महासचिव नागेश हरवाळकर गौतम गायकवाड तालुका उपाध्यक्ष नरसिंह गायकवाड बबन गायकवाड रमजान मुल्ला हनुमंत जाधव संदीप गजदाने माणिक गायकवाड शहराध्यक्ष विशाल ठोंबरे शहर महासचिव भारत देडे चंनु शिंगे, सम्यक विद्यार्थी आंदोलन राज्य प्रवक्ता रविराज पोटे भारत सोनकांबळे दत्ता मढी खांबे विजयकुमार बाळशंकर संदीप बाळ शंकर अमृत सोनकांबळे संतोष बाळ शंकर बाबुलाल ताची सैपन चाचा दयानंद गायकवाड पिंटू गायकवाड गौतम इब्रामपूर आकाश बनसोडे सुनील शिंगे, प्रकाश शिंदे मऱ्यापा शिवशरण, खाजाप्पा अहिवाळे, शेखर सोनकांबळे शिवाजी चौगुले आणि सर्व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते

# मुंबई येथील भाविक नंदिनी मथुरे यांचेकडून श्री विट्ठल रुक्मिणी चरणी चांदीच्या पादुका अर्पण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : अश्विन शुद्ध दशमी विजयादशमी निमित्त मुंबई येथील भाविक नंदिनी अशोक मथुरे यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या चरणी चांदीच्या पादुका अर्पण केल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

या पादुकाचे वजन सुमारे ४ किलो ६७० ग्रॅम होत असून, रक्कम रू.४२५६२४/- इतकी किंमत होत आहे. त्याबद्दल त्यांचा मंदिरे समितीचे वतीने विभाग प्रमुख ज्ञानेश्वर कुलकर्णी यांच्या हस्ते श्रींचा फोटो व उपरणे देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. त्यावेळी मंदिर समितीचे सराफ गणेश भणगे



व देणगीदारांचे कुटुंबीय उपस्थित होते.

## सीमोल्लंघन करूया माढ्याच्या विकासाचा रथ पुढे नेऊया : अभिजीत पाटील

## चेअरमन अभिजीत पाटील यांचा जनसंपर्क वाढीवर मोठा भर

# माढ्याच्या विकासासाठी येणाऱ्या काळात परिवर्तनाची नांदी : अभिजीत पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आपले महापुरुष सीमोल्लंघन करून लढाईच्या मोहिमेवर जात होते. तो आदर्श घेऊन मी पुढे जात आहे. इथल्या शेवटच्या घटकाचा विचार करून माढ्याच्या २५ वर्षाचा बॅकलॉक भरून काढण्यासाठी आणि माढ्याच्या सर्वांगीण



विकासासाठी साथ मिळेल असा विश्वास व्यक्त करत चेअरमन अभिजीत पाटील यांनी माढ्याच्या विकासाचा रथ पुढे नेऊया असे आवाहन दसऱ्याच्या मुहूर्तावर रावण दहन प्रसंगी येथील जनतेला केले.

### रावण दहन करून माढा कृषी व सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन

**उद्याच्या काळात फक्त ऊस आणि पाण्यावर बोलून चालणार नाही तर इथल्या शेवटच्या घटकाचा विचार करून माढ्याच्या सर्वांगीण विकासासाठी काम केले पाहिजे, युवक, महिलावर्ग, बेरोजगारी, सांस्कृतिक जडणघडण याचबरोबर ज्या युवकांकडे शेतजमीन नाही त्यासाठी काम केले पाहिजे. व्यावसायिक करणाऱ्यांना चालना दिली पाहिजे, माढ्याच्या २५ वर्षाचा बॅकलॉक भरून काढावा लागेल यासाठी येथील जनतेची साथ मिळेल असा विश्वास व्यक्त करत ते म्हणाले की कायम अधर्मावर, असत्यावर विजय मिळवता येतो. असत्य खूप काळ टिकत नाही. उद्याच्या काळात सत्याच्या बाजूने उभे राहण्यासाठी येथील जनता सज्ज आहे. प्रत्येक युवकाच्या सोबत हातात हात दिल्यानंतर जी तडफ जाणवते ती तडफ उद्याच्या परिवर्तनाची नांदी दिसत आहे असा विश्वास अभिजित पाटील यांनी व्यक्त केला.**

ते माढा येथे आयोजित करण्यात आलेल्या माढा कृषी व सांस्कृतिक महोत्सव या कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी त्यांनी माढा कृषी व सांस्कृतिक महोत्सवाच्या माध्यमातून कृषीविषयक मार्गदर्शन आणि सायंकाळी



संस्कृती कार्यक्रमाचे आयोजन विठ्ठल प्रतिष्ठानच्या माध्यमातून घेण्यात आला असल्याचे सांगत पुढील काळात असे वेगवेगळे प्रयोग घेत नाही तोपर्यंत येथील तरुणांना ऊर्जा मिळणार नाही. उद्याच्या काळात माढेकरांना अनेक गोष्टी जाणून घ्यायच्या आहेत. यासाठी येणाऱ्या काळात परिवर्तन करावे लागेल माढ्याच्या भविष्यासाठी सीमोल्लंघन करूया माढ्याच्या विकासाचा रथ पुढे नेऊया असे आवाहन अभिजीत पाटील यांनी यावेळी केले.

यावेळी उपस्थित संभाजी ब्रिगेड संघटक दिनेश जगदाळे, डॉ.हनुमंत क्षीरसागर, केवडचे मा. सरपंच पांडुरंग शिरसाट, आबासाहेब साठे, ऋषीकेश तांबिले, आटकेपार झेंडा ग्रुपचे दयानंद महाडिक, उंदरगाव मा.उपसरपंच संजय तांबिले, यशवंत भोसले सर, सागर मसूरकर, समाधान गडेकर, दत्तात्रय पाटेकर, गोटू नाईक, किरण पाटेकर, दीपक इंगळे, प्रीतम पाटेकर, सुरज बारबोले, जनहित शेतकरी संघटना बालाजी बारबोले यासह आदी मान्यवर उपस्थित होते.